महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास आयुक्तालय महाराष्ट्र राज्य नाशिक
आदिवासी विकास भवन, पहिला माळा, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक
दूरध्वनी क्र२५७५६१५ ., २३१७९३८फॅक्स क्र.२५७९२०८ .
ई -: मेल-ednctd.nsk-mh@gov.in वेबसाईट -:www.mahatribal.gov.in

क्र.शावगृ -२०२४/प्र.क्र.४१/का.९(२)/ ५५१ दिनांक : 22/1/26

~~२२.०१.२०२६.~~

**तातडीचे/कालमर्यादा :-**

**प्रति,**

१. मा.अपर आयुक्त,
आदिवासी विकास विभाग,
नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर.

२. प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,----------- सर्व.

**विषय :- पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेच्या सन २०२५-२६ प्रवेशाबाबत...**

**संदर्भ :-** १. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय-के. आवगृ-२०१६/प्र.क.८७/का-१२
दिनांक-२७/११/२०१८.

२. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२ दिनांक- १६/९/२०१९.

३. शासन पत्र क्र. नानिशा-१४२३/प्र.क्र.६१/का.१२,दिनांक ०८ ऑगष्ट,२०२३.

**महोदय,/महोदया**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की,ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश देणे शक्य होत नाही अशा विद्यार्थ्यांना विभागाने ऑक्टोंबर, २०१६ अन्वये धोरणात्मक निर्णय घेऊन इयत्ता १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणाकरीता निवास, भोजन, निर्वाहभत्ता व शैक्षणिक साहित्यासाठी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये ( DBT) थेट रक्कम वितरण करण्याबाबत आदिवासी विभागाकडून दिनांक १५ ऑक्टोंबर, २०१६ चे शासन निर्णयान्वये "पंडित दीनदयाल उपाध्याय स्वंयम योजना " लागू केली आहे.

त्यानुषंगाने स्वयंम योजनेत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात ३०७०१ इतके विद्यार्थी नुतनिकरणसाठी पात्र आहेत.त्यापैकी आजअखेर २२९२४ इतके नुतिनीकरण अर्ज प्राप्त झालेले आहेत.उर्वरीत ७७७७ इतके अर्ज प्राप्त होणे बाकी आहेत.प्राप्त अर्जापैकी महाविद्यालयस्तर ११०१ व प्रकल्प स्तरावर १०८१ अर्ज तपासणी बाकी आहेत.

त्यानुषंगाने सदरचे अर्ज तातडीने निकाली काढणेबाबत खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

१. प्रकल्प अधिकारी यांनी आपले स्तरावरील अर्ज तातडीने निकाली काढावेत.तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबीत अर्ज निकाली काढणेबाबत आपले कार्यालयातील संबंधित विस्तार अधिकारी, नजिकच्या वसतीगृहाचे गृहपाल आदिवासी विकास निरीक्षक यांना प्रत्यक्ष महाविद्यालयास भेट देऊन सदर अर्ज निकाली काढणेबाबतची कार्यवाही करावी.

२. सन २०२५-२६ करीता नुतिनीकरणास पात्र १००५० विद्यार्थ्यांनी अद्याप पर्यंत नुतनिकरणास अर्ज सादर केलेला नाही अशा विद्यार्थ्यांना दिनांक ३१.०१.२०२६ पर्यत अर्ज भरण्यास वर्तमानपत्रात मोफत प्रसिद्धी देऊन प्रकल्प अधिकारी,यांनी आव्हान करावे.दिनांक ३१.०१.२०२६ रोजी पर्यंत नुतनिकरणास पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त न झाल्यास त्यांच्या जागी नविन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल याबाबत त्यांना अवगत करण्यात यावे.

३. ज्या विद्यार्थ्यांचा शासकीय वसतीगृहात गुणवत्ता यादीद्वारे निवड झालेली आहे,व त्यांना आवेदन पत्र निर्गमित झाले आहे.अशा विद्यार्थ्यांना वसतीगृहातच प्रवेश देण्यात यावा,अशा विद्यार्थ्यांचे अर्ज स्वयंम योजनेत हस्तांतर करण्यात येऊ नये अथवा स्वयंम योजनेसाठी वसतीगृहाचा अर्ज रद्द करु नये.ज्या विद्यार्थ्यांचा गुणवत्तेच्या आधारे वसतीगृह योजनेत निवड झालेली नाही केवळ अशाच विद्यार्थ्यांचे अर्ज स्वयंम योजनेत प्रकल्प स्तरावरुन वर्ग करण्यात यावे,याबाबत दक्षता संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी घेण्यात यावी.

**आपला विश्वासू**

**संतोष ठुबे**<br>
**सहआयुक्त,(शिक्षण)**<br>
**आदिवासी विकास आयुक्तालय**<br>
**महाराष्ट्र राज्य,नाशिक.**